• वर्ष : ०३ • अंक : २३४ • पुणे • शुक्रवार, दि. १५ मे २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



# जेजुरीत उड्डाणपूल, पंढरपूरला रिंग रोड

## नितीन गडकरींनी केल्या मोठ्या प्रकल्पांच्या घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरूवारी (१४ मे) पुणे-हडपसर-दिवे घाट-सासवड-जेजुरी-फलटण-नातेपुते-वेळापूर मार्गे पंढरपूरपर्यंत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या कामांची पाहणी केली. या पहाणी दरम्यान पत्रकार परिषद घेत गडकरी यांनी जेजुरीत नवीन उड्डाणपुल, फलटणमधील रस्त्यांचे रुंदीकरण, नीरा रस्त्यावर आरओबी, पंढरपूर बायपास आणि दोन्ही पालखी मार्ग एकत्र येतात त्या तोंडले गावात उड्डाणपूल, अशा विविध विकास प्रकल्पांची घोषणा केली.



या पत्रकार परिषदेला माढ्याचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर या वेळी उपस्थित होते. पालखी मार्गाच्या पाहणीदरम्यान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करत संपूर्ण प्रवास पत्रकारांबरोबरच बसमध्ये केला. दरम्यान, सुरवडी, फलटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधत त्यांनी विविध विकासकामांची माहिती दिली. सहा टप्प्यांमध्ये सुरू असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचे काम पूर्ण होत आले आहे. आता या मार्गावर काही नवीन विशेष प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. त्यात जेजुरीत दोन किलोमीटर लांबीचा उड्डाणपुल उभारण्यात येत असून, त्यासाठी २५० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. या पुलामुळे जेजुरी गड दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल, असा विश्वास नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. फलटण शहरात वन टाईम इम्प्रूव्हमेंट तत्त्वावर रस्त्यांच्या विकासासाठी ९७ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

फलटण शहरातील अरुंद रस्ते आणि राव रामोसे पुलाचे रुंदीकरण झाल्यास शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटेल. तसेच पालखीच्या वेळी वारकऱ्यांनाही चालणे सोयीचे होईल, असेही गडकरी यांनी सांगितले. नीरा रस्त्यावर ७२ मीटर लांबीचा रेल्वे ओव्हर ब्रीज बांधण्यात येणार असल्याची घोषणाही गडकरी यांनी केली. ते म्हणाले, या पुलामुळे रस्ता जोडला जाईल आणि सध्या होत असलेल्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होईल. टेंभूर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गामध्ये साडेनऊ किलोमीटरचा पंढरपूर बाह्यवळण (बायपास) रस्ता करण्यात येणार आहे.

टेंभुर्णी-पंढरपूर अंतर्गत प्रस्तावित या बायपासमुळे शिर्डी-अहिल्यानगर-टेंभुर्णी कडून येणारी वाहतूक पंढरपूर शहरात प्रवेश न करता विजापूर-मंगळवेढा मार्गे शहराबाहेरून जाईल. अपघाताचे प्रमाण कमी होईल आणि हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर पंढरपूरला पूर्णपणे रिंग रोड उपलब्ध होणार आहे. तसेच दोन्ही पालखी मार्ग एकमेकांना मिळतात, त्या तोंडले गावात उड्डाणपुल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

## नितीन गडकरींच्या ताफ्यात ३०-४० गाड्या; काटकसरीचा विसर?


केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करत बसमधून प्रवास करत संत ज्ञानेश्वर महाराज महामार्गाती पहाणी केली. पण, फलटणनंतर गडकरींच्या बसच्या पुढे-मागे गाड्यांची संख्या वाढली आणि ताफ्यात अचानक ३०-४० गाडी असल्याचे समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर नितीन गडकरी यांनी ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली. गडकरी यांनी पुणे-हडपसर-दिवे घाट-सासवड-जेजुरी-फलटण-नातेपुते-वेळापूर मार्गे पंढरपूरपर्यंत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या कामाची पाहणी पत्रकारांबरोबच बसमधून केली. या पाहणी दरम्यान फलटणमध्ये त्यांची पत्रकार परिषद होणार होती. या पत्रकार परिषदेला माढ्याचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर आलेले. त्यांनी गडकरी यांची भेट घेतली. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर या महामार्गावर आणखी काही नवीन प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्गांचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याची माहितीही नितीन गडकरी यांनी दिली. सध्या प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली असून, येत्या काळात वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात येणार असल्याचेही गडकरी यांनी नमूद केले. नितीन गडकरी यांच्या पत्रकार परिषदेनंतर माढ्याचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर गडकरी यांच्यासह एकाच बसमधून पंढरपूरकडे जाणार होते. दरम्यान, त्यांच्यात राजकीय विषयांवर चर्चा झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या रणजीतसिंह निंबाळकर यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला होता. या निवडणुकीपासूनच मोहिते आणि निंबाळकर एकमेकांवर टिका करण्याची संधी सोडत नसल्याचे चित्र होते. आता नितीन गडकरींबरोबर धैर्यशिल मोहिते-पाटील आणि रणजीतसिंह निंबाळकर यांच्यात झालेली भेट, चर्चेचा विषय ठरली आहे.

# बिनविरोध निवडून आलेल्या १० विधानपरिषद सदस्यांनी घेतली शपथ

## सभापती राम शिंदे यांनी दिली पद आणि गोपनीयतेची शपथ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत ९ आणि पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या १ अशा १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा आज विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात दिमाखात पार पडला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या सर्व नवनियुक्त आमदारांना सदस्यत्वाची शपथ दिली. याप्रसंगी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील महत्त्वाचे सदस्य उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी यांनी इंग्रजीमधून आमदारकीची शपथ घेतली. विधान परिषदेच्या एकूण १० जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली होती. यामध्ये ९ जागांसाठी नियमित निवडणूक, तर एका जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. १२ मे २०२६ रोजी मतदान होणार होते, मात्र १० जागांसाठी केवळ १० उमेदवारांचेच अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने त्यांच्या वाट्याला सर्वाधिक ६ जागा आल्या, तर शिंदे गटाने २ आणि अजित पवार गट व ठाकरे गटाला प्रत्येकी १ जागा मिळाली आहे. या निवडीमध्ये विधानसभेतील सध्याच्या पक्षीय बलाबलानुसार जागांचे वाटप झाले आहे. सध्या विधानसभेत भाजपचे १३१, शिवसेना (शिंदे गट) ५७, तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) ४० सदस्य आहेत. विरोधी पक्षात शिवसेना (ठाकरे गट) कडे २०, काँग्रेसकडे १६ आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडे १० सदस्य आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा निर्णय

# राज्य प्रशासनात फेरबदल

## पुणे विभागीय आयुक्तांना हटविले, तुकाराम मुंढे वेटिंग वर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**



मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक मोठा निर्णय घेताना प्रशासनात घाऊक बदल्याचे आदेश दिले. त्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. फडणवीस यांनी काही दिवसापूर्वी प्रशासनात मोठ्या प्रमाणात बदल्या केल्या होत्या. त्यानंतर नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम बंगाल, केरळ राज्यांच्या निवडणुकांसाठी राज्यातील अनेक सनदी अधिकारी निरीक्षक म्हणून या दोन्ही राज्यात नियुक्त करण्यात आले होते. निवडणुकीच्या कामावरून हे अधिकारी परतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा प्रशासनात खांदेपालट सुरू केली असून आज काही अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच येत्या काही दिवसात आणखी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार असल्याची माहिती सूत्राने दिली. विविध पदावर आपल्या कामाचा आणि कर्तुत्वाचा ठसा उमठविणारे वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांना मात्र सरकारने पुन्हा एकदा वेटिंगवरच ठेवले आहे. दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून काम करताना मुंडे यांनी या विभागातील भ्रष्टाचार मोडून काढताना अनेक बोगस दिव्यांग कल्यान संस्थांवर कारवाईचा बडगा उगारत त्या बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे नाराज झालेल्या मंडळींनी मुंढे यांच्या बदलीसाठी मुख्यमंत्र्याकडे आग्रह धरला होता. परिणामी मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव पदावरून बदली करण्यात आली असून गेले महिनाभर मुंढे यांना कोठेही नियुक्त न देण्यात आल्यामुळे ते सध्या वेटिंग वरच आहेत.













## थोडक्यात पण महत्वाचे




### बांधकाम उद्योग क्षेत्रातील नेत्यांनी दिला नावीन्य आणि शाश्वततेवर भर

पुणे (आरंभ पर्व) : मुंबईत ३ ते ५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या 'वर्ल्ड ऑफ कॉंक्रिट इंडिया'च्या १२ व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर, इन्फॉर्मा मार्केट्सतर्फे पुण्यात एका विशेष गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत पुणे आणि पश्चिम भारतातील वेगाने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा, नवीन बांधकाम साहित्य आणि शाश्वत बांधकाम पद्धतींच्या गरजेवर सखोल चर्चा झाली. या गोलमेज परिषदेच्या चर्चेत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (BAI), पुणे चे राज्य सचिव श्री. मनोज देशमुख; आर्किटेक्ट्स इंजिनियर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनचे (AESA) अध्यक्ष महेश बांगड; इंडस्ट्रियल फ्लोअरिंग असोसिएशनचे (IFA) अध्यक्ष आणि ॲव्हकॉन टेक्निक्सचे व्यवस्थापकीय संचालक अजय सिंगम; १लॅटिस, आईजीएस चे वरिष्ठ संचालक श्री. सुयोग केळुस्कर; सिका इंडियाचे संचालक (टार्गेट मार्केट अँड प्रॉडक्ट मॅनेजमेंट) श्री. जसवंत शोभना; बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजीचे महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी विभाग) श्री. आप्पासाहेब भोसले आणि इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडियाचे वरिष्ठ गट संचालक श्री. रजनीश खट्टर यांचा समावेश होता.

### भारताची पुढील आर्थिक भरारी एआयच्याच जोरावर

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रायोगिकतेच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय वाढीला पाठबळ देणारी पायाभूत शक्ती होण्यास सज्ज असल्यामुळे भारत आर्थिक रूपांतरणाच्या एका निर्णायक टप्प्यात प्रवेश करणार आहे, असा निष्कर्ष आयबीएम इन्स्टिट्यूट फॉर बिझनेस व्हॅल्यू आणि इंडियाएआय यांच्याद्वारे करण्यात आलेल्या एका नवीन अभ्यासाद्वारे काढण्यात आला आहे. २०३० सालापर्यंत एआय भारताच्या अर्थव्यवस्थेत ५०० अब्ज डॉलर्सहून अधिक योगदान देऊ शकेल असे या संशोधनातून पुढे आले आहे, त्यामुळे जगातील सर्वांत गतीशील एआय-प्रेरित अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश होणार आहे. ‘फ्रॉम प्रॉमिस टू पॉवर: हाउ एआय इज रिडिफायनिंग इंडियाज इकनॉमिक फ्युचर’ या शीर्षकाखाली करण्यात आलेल्या या अभ्यासामध्ये महत्त्वाकांक्षा व तत्पर कृतीची आवश्यकता यांच्यातील प्रभावी संयोग अधोरेखित करण्यात आला आहे. एआयमधील गुंतवणूक भारताच्या जीडीपी वाढीवर थेट प्रभाव टाकणार असल्याचे मत उद्योगक्षेत्रात नेतृत्वाची भूमिका बजावणाऱ्या पाचपैकी चार जणांनी व्यक्त केले आहे, तर भारत २०३० सालापर्यंत आघाडीचे एआय राष्ट्र म्हणून उदयाला येणार असल्याचा विश्वास ७३ टक्के उद्योजकांनी व्यक्त केला आहे.



### स्मारकाच्या नूतनीकरणाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरातील भव्य धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या नूतनीकरणाच्या कामाचा भूमिपूजन समारंभ गुरुवारी (दि. १४ मे) धर्मवीर संभाजी महाराजांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त उत्साहात पार पडला. या स्मारकाच्या नूतनीकरणासाठी भूमिपूजन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धर्मवीर संभाजी प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने सकाळी शंभूराजांचा जन्मोत्सव सोहळा आणि पाळणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच पुण्यातील इतिहास संशोधक आणि नित्यपूजा करणाऱ्या विविध संस्थांचा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान करण्यात आला.

### लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार केतन धेंडे निलंबित



लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार केतन उत्तम धेंडे यांना गंभीर शिस्तभंग आणि गुन्हे तपासात हस्तक्षेप केल्याच्या आरोपांवरून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे शहर यांनी निलंबन आदेश जारी केला आहे. या कारवाईपूर्वी गुन्हे शाखेतील खंडणी पथक-२ तसेच लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालांचा आधार घेण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा क्रमांक ११५/२०२६ मधील आरोपींना मदत करण्यासाठी केतन धेंडे यांनी तपासी अधिकाऱ्यांवर दबाव टाकल्याचा आरोप आहे. आरोपींना मदत व्हावी यासाठी त्यांनी तपासी अधिकाऱ्यांना वारंवार फोन केले, प्रत्यक्ष भेटी घेतल्या आणि तपासात अवाजवी हस्तक्षेप केल्याचे चौकशीत समोर आले आहे.

### निधन वार्ता - बाळासाहेब काळभोर



लोणी काळभोर : कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब अमृता काळभोर (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते येथील अभिनव चेतना नागरी सहकारी पतसंस्थेत स्थापनेपासून कार्यरत होते. या संस्थेचे त्यांनी उपाध्यक्ष व संचालक म्हणून अनेक वर्षे काम पाहिले. तसेच त्यांच्या पुढाकारातून कदमवाकवस्ती येथे विठ्ठल मंदिर उभारले गेले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अभिनव पतसंस्थेचे संचालक मुकुंद काळभोर यांचे ते वडील होत.

# ‘पॉपाईज इंडिया’ची पुण्यात तीन नवीन स्टोअर्स सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्युबिलंट फूडवर्क्स लि. या भारतातील आघाडीच्या फूड सर्व्हिस कंपनीने पुण्यात पॉपाईज® या ब्रँडची तीन नवीन रेस्टॉरंट्स सुरू केली आहेत. कंपनीने आज ही घोषणा केली. भारतातील वेगाने वाढणाऱ्या आणि उच्च क्षमता असलेल्या खाद्यपदार्थांच्या बाजारपेठेत पॉपाईज® या ब्रँडचा प्रवेश होत आहे. प्रमुख शहरांकडे लक्ष केंद्रित करीत आणि ग्राहकांची बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेत पॉपाईज® सातत्याने विस्तार करीत आहे.




मे महिन्यात सुरू होणारी ही तीन रेस्टॉरंट्स विमाननगरमधील फिनिक्स मार्केट सिटी, मगरपट्टा येथील सीझन्स मॉल आणि पिंपरी-चिंचवड येथील एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉल अशा पुण्यातील महत्त्वाच्या ठिकाणी उघडली जाणार आहेत. त्यामुळे शहरातील प्रमुख निवासी आणि व्यावसायिक भागांमध्ये ग्राहकांना पॉपाईज® सहज उपलब्ध होणार आहे. तरुण आणि आधुनिक जीवनशैली असलेली लोकसंख्या, मोठा विद्यार्थीवर्ग आणि वाढत्या काम करणाऱ्या तरूण व्यावसायिक वर्गामुळे पुणे हे वारंवार बाहेर खाण्याची आवड असलेले महत्त्वाचे शहर बनले आहे. जागतिक दर्जाच्या क्यूएसआर (क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट) ब्रँड्ससाठी येथे ग्राहकांची मागणी झपाट्याने वाढत आहे. ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी लक्षात घेऊन पॉपाईज आता आपल्या खास ‘लुइसियाना’-स्टाइलच्या चवी पुणेकरांसाठी घेऊन येत आहे. पॉपाईज हा ‘लुइसियाना’ येथे सुरू झालेला जागतिक स्तरावर प्रसिद्ध ब्रँड आहे. आपल्या मसालेदार आणि चविष्ट फ्राईड चिकनसाठी तो ओळखला जातो. त्यांची खास रेसिपी १२ तास मॅरिनेट केली जाते आणि त्यात खास कॅजून मसाल्यांचा वापर केला जातो. त्यामुळे जगभरातील ग्राहकांमध्ये या ब्रँडची मोठी लोकप्रियता आहे. ‘पॉपाईज’च्या प्रसिद्ध चिकन सँडविचमुळे या ब्रँडला जागतिक स्तरावर मोठी ओळख मिळाली होती. बाजारात सादर झाल्यानंतर या सँडविचला ग्राहकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. बंगळुरू, चेन्नई, दिल्ली एनसीआर, पंजाब आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये यश मिळवल्यानंतर आता पॉपाईज आपल्या खास डिशेस पुण्यातही घेऊन येत आहे. ज्युबिलंट फूडवर्क्स लि.चे पॉपाईज ब्रँडसाठीचे कार्यकारी उपाध्यक्ष व चीफ बिझनेस ऑफिसर विभोर गुप्ता यांनी ‘पॉपाईज’च्या सादरीकरणाबाबत आनंद व्यक्त करताना म्हटले, “पुण्यात पॉपाईज सुरू करण्याबाबत ग्राहकांकडून खूप चौकशी होत होत्या. त्यामुळे आता पॉपाईज सादर करताना आम्ही खूप उत्साहित आहोत. सुरुवातीला आमची तीन स्टोअर्स सुरू होत आहेत. यापुढे आणखी अनेक स्टोअर्स सुरू करण्याची आमची योजना आहे. तरुण, प्रवासाची आवड असलेले आणि वेगळ्या तसेच चविष्ट खाद्यपदार्थांचा शोध घेणारे ग्राहक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पुणे हे आमच्यासाठी मोठी क्षमता असलेले मार्केट आहे. भारतातील महत्त्वाच्या शहरांमध्ये ‘पॉपाईज’चा विस्तार करण्याच्या दृष्टीने पुण्यातील ही सुरुवात एक धोरणात्मक टप्पा ठरणार आहे.”

## ॲबाक्कस म्युच्युअल फंडने १ लाख गुंतवणूकदारांचा गाठला टप्पा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲबाक्कस म्युच्युअल फंडने त्यांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) 5,000 कोटी रुपयांचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. फंड हाऊसने नमूद केले आहे की, एकूण युनिक गुंतवणूकदारांची संख्या 1 लाखांच्या पुढे गेली आहे, ज्यामधून गुंतवणूकदार आणि वितरण भागीदारांचा वाढता विश्वास दिसून येतो. ॲबाक्कस म्युच्युअल फंडने डिसेंबर 2025 मध्ये आपली पहिली योजना लाँच केली होती. फ्लेक्सी कॅप फंड श्रेणीतील त्यांच्या पहिल्या इक्विटी ऑफरला न्यू फंड ऑफर (एनएफओ) दरम्यान 2,468 कोटी रुपयांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सध्या हे फंड हाऊस फ्लेक्सी कॅप फंड आणि स्मॉल कॅप फंड या श्रेणींमधील दोन इक्विटी योजनांसह लिक्विड फंड व्यवस्थापित करते. 8 मे 2026 पर्यंत फंड हाऊसचे एकूण एयूएम 5,482 कोटी रुपये आहे, ज्यामध्ये 2,001 ठिकाणे आणि 9,573 पिन कोडमधील 1,00,702 हून अधिक गुंतवणूकदारांचा समावेश आहे. श्री. सुनिल सिंघानिया यांनी स्थापन केलेला ॲबाक्कस म्युच्युअल फंड बाजारपेठेतील सखोल अनुभव आणि शिस्तबद्ध, संशोधन-आधारित गुंतवणूक दृष्टिकोनाला एकत्र आणतो. पोर्टफोलिओची रचना आणि शेअर्सची निवड ॲबाक्कसच्या गुंतवणूक तत्त्वज्ञानानुसार आणि त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण मीट्स (MEETS) फ्रेमवर्कद्वारे केली जाते. जे या फंड हाऊसच्या गुंतवणूक प्रक्रियेचा दृढ पाया आहेत. गुंतवणूक टीमचे सखोल ज्ञान, अनुभव आणि संशोधन क्षमता यामुळे ही प्रक्रिया अधिक प्रबळ होते.




## बजाज समूहाची शंभर वर्षे पूर्ण; गौरवशाली प्रवास

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**




बजाज ग्रुप या भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित उद्योग समूहांपैकी एक असलेल्या समूहाने आपल्या स्थापनेची १०० वर्षे पूर्ण केली आहेत. १४८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मार्केट कॅपसह भारतातील सर्वात मोठ्या उद्योग समूहांपैकी एक असलेल्या बजाज समूहाने ऑटोमोबाईल, आर्थिक सेवा, ग्राहक उपयोज्य विद्युत उपकरणे आणि इंजिनिअरिंग क्षेत्रांत भक्कम उपस्थिती निर्माण केली असून आज भारतातील प्रत्येक तीन घरांपैकी एका घरापर्यंत समूहाची सेवा पोहोचली आहे.

१९२६ मध्ये स्वातंत्र्यसेनानी, समाजसुधारक आणि उद्योगपती जमनालाल बजाज यांनी मुंबईत समूहाचे पहिले कार्यालय स्थापन केले. महात्मा गांधींचे ‘पाचवे मानसपुत्र’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमनालाल बजाज यांच्या विचारसरणीवर उभा राहिलेला हा समूह आज १०० हून अधिक कंपन्यांद्वारे १०० पेक्षा जास्त देशांमध्ये कार्यरत आहे. समूहात सध्या १ लाख ३० हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

राष्ट्रनिर्मितीत बजाज समूहाच्या योगदानाची दखल घेत पंतप्रधान Narendra Modi यांनी शुभेच्छा संदेश पाठविला. त्यांनी म्हटले की, “१०० वर्षांचा प्रवास हा कोणत्याही संस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. बजाज समूहाने बदलत्या काळानुसार स्वतःला जुळवून घेत आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रवासात समूहाची भूमिका अविभाज्य राहिली आहे.” पंतप्रधानांनी पुढे म्हटले की, “रोजगार निर्मिती, संशोधन, समुदाय विकास आणि सर्वसमावेशक प्रगतीसाठी बजाज समूहाने सातत्याने काम केले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यात अशा संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे.”

आज समूहात बजाज ऑटो, बजाज फिनसर्व्ह, बजाज फायनान्स, बजाज हाउसिंग फायनान्स, बजाज इलेक्ट्रिकल्स आणि मुकंद यांसारख्या प्रमुख सूचिबद्ध कंपन्यांचा समावेश आहे. समूह लवकरच हेल्थकेअर क्षेत्रातही पदार्पण करणार आहे.

मुंबईतील National Sports Club of India येथे आयोजित शताब्दी सोहळ्यास उद्योगजगत, राजकीय क्षेत्र आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बजाज परिवाराचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग, व्यापारापासून उत्पादन आणि आर्थिक सेवांपर्यंतचा प्रवास तसेच आधुनिक तंत्रज्ञानातील विस्तार उलगडून दाखविण्यात आला.

## बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पोचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हयात रीजेंसी, विमाननगर, पुणे येथे आज २ऱ्या ‘बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६’ ला उत्साहात प्रारंभ झाला. कृषी जैविक (Agricultural Biologicals) क्षेत्रातील धोरणकर्ते, शास्त्रज्ञ, उद्योग क्षेत्रातील नेते, नवोन्मेषक, कृषी-इनपुट कंपन्या, स्टार्टअप्स आणि जागतिक स्तरावरील विविध भागधारकांना एका व्यासपीठावर आणणाऱ्या या परिषद व प्रदर्शनाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्या वतीने करण्यात आले आहे.




“कृषी जैविक उत्पादनांच्या निर्मितीसाठी भारत जागतिक उत्पादन केंद्र” ही या प्रतिष्ठित दोन दिवसीय परिषद व प्रदर्शनाची मुख्य संकल्पना आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाचे कृषिमंत्री तथा प्रमुख पाहुणे मा. दत्तात्रय भरणे यांच्या विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे झाले. त्यांनी परिषदेला अधिकृतपणे उद्घाटन करताना शाश्वत शेती, मातीचे आरोग्य सुधारणा आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या माध्यमातून भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी कृषी जैविक उत्पादनांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले, “शाश्वत शेती आणि अन्नसुरक्षेसाठी कृषी जैविक उत्पादने हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. नवोन्मेष, संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि भारत या क्षेत्रात जागतिक नेतृत्व करू शकतात.” उद्घाटन सत्रात स्नेल इंटिग्रल प्रा. लि. चे संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार श्री. अमित बीके खरे, कान बायोसिसच्या सीएमडी तथा बायोॲग्री नेक्स्ट आयोजन समितीच्या सह-अध्यक्षा सौ. संदीपा कानिटकर, क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनचे मुख्य शाश्वतता अधिकारी व ग्रीनॲग प्रमुख श्री. सर्जीवन मनहास, आयसीएआर-आयआयएचआरचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. राव, महाराष्ट्र कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री. सुनील बोरकर आणि नोव्होनेसिसचे दक्षिण आशिया, मध्य पूर्व व आफ्रिका विभागाचे कृषी प्रमुख श्री. शन्मुगम संबंथन यांचा मान्यवर पॅनेलमध्ये समावेश होता.

## खेड एसईझेड मध्ये दोन गटांत हाणामारी व गोळीबार

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

- १० संशयीत अटक

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील खेड एसईझेड परिसरात दोन गटांत झालेली तुफान हाणामारी व पिस्तुलातून गोळीबार केल्याप्रकरणी खेड पोलिसांनी २३ जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल केले असून, १० जणांना अटक केली आहे. अटक संशयितांना खेड न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. हे टोळीयुद्ध एसईझेड मधील क्रेनच्या ठेक्यावरून झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दावडी (ता. खेड) गावच्या हद्दीतील एका कंपनीत क्रेन लावण्याच्या वादातून ही घटना घडली. पंकज रामदास दौंडकर (रा. कनेरसर) यांच्या फिर्यादीनुसार, एका कंपनीच्या कामात जनरेटर हलविण्याचे काम सुरू असताना संतोष अंकुश गव्हाणे, अमोल अंकुश गव्हाणे, स्वप्नील गव्हाणे, मंगेश गव्हाणे, सुरेश गव्हाणे, राहुल गव्हाणे, सुनील गव्हाणे (सर्व रा. दावडी, ता. खेड), संदेश गोरडे व उमेश गोरडे (रा. गोसासी, ता.खेड) आणि इतर ४ ते ५ जणांनी काम बंद पाडून फिर्यादीला लोखंडी रॉडने मारहाण केली. तर संदेश गोरडेने दौंडकर यांच्या दिशेने पिस्तुलातून दोन गोळ्या झाडून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

## मुलीच्या स्वप्नासाठी बाप झाला चित्रपटाचा निर्माता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आलं लसूण विकणाऱ्या नागपूरमधील एका सर्वसामान्य व्यक्तिमत्व असलेल्या रवी पंडित पवार यांनी आपलं आयुष्य एकदम साधं ठेवून मनोरंजन क्षेत्रात अभिनेत्रींचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्या मुलींसाठी चक्क मराठी सिनेमा तयार केला आहे. "पिक्चर बॉईज" असे नाव असलेला हा चित्रपट येत्या १५ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटांच्या स्वप्नमयी जगात गावातल्या दोन तरुणांचा प्रवेश होतो आणि त्यांच्या आयुष्यात काय काय घडते अशा मनोरंजक कथासूत्रावर हा चित्रपट बेतला असून, चित्रपटाचा धमाल ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत.



चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंह राजपूत यांनी केलं आहे. मंदार चोळकर, सुनील दोडगे, संध्या-प्रनिकेत यांनी लिहिलेल्या गीतांना वरुण लिखाते आणि संध्या-प्रनिकेत यांनी संगीतबद्ध केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत. विनोद पाटील यांनी छायांकन, रोहन पाटील यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे.



# ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठात शंभूजयंती उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ढोल-ताशांचा निनाद, भगवी पताका, पहाडी आवाजातील गगनभेदी शिव-शंभू गर्जना, ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय!’, ‘जय भवानी, जय शिवराय, जय शंभूराजे!’ आणि ‘नमो पार्वती पते, हर हर महादेव’ या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात (एडीटी) महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. एमआयटी एडीटी विद्यापीठातील उर्मिलाताई कराड सभागृहात प्रतिमापूजन, शिव-शंभू गर्जना व विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या व्याख्यानाद्वारे स्वराज्याचे धाकटे छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. याप्रसंगी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शिवराय ढोल-ताशा पथकातील सदस्यांचा त्यांच्या पथकातील योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. व्याख्यानानंतर सभागृहात 'छावा' या चित्रपटाचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावरील प्रसंग मोठ्या पडद्यावर अनुभवताना सभागृहातील विद्यार्थ्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तर चित्रपटाचा शेवट पाहताना सभागृहातील वातावरण अतिशय भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. याप्रसंगी व्याख्यानात प्रा. डॉ. कराड म्हणाले, “छत्रपती शिवाजी महाराज हे ऊर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. शिवरायांनंतर स्वराज्यावर चालून आलेली संकटांची मालिका छत्रपती संभाजी महाराजांनी लीलया पेलली. छत्रपती झाल्यानंतर त्यांनी पुढील नऊ वर्षे अविरत, न थकता असंख्य लढाया लढल्या आणि सर्वच जिंकल्या. त्यांच्या चिवट प्रतिकारामुळेच औरंगजेबाचे लाखोंचे बलाढ्य सैन्यही हतबल झाले. त्यामुळे संभाजी राजांचे इतिहासातील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्यामुळेच खरंतर महाराष्ट्रधर्म टिकला, वाढला,” असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. १५ मे २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतीची तपासणी

दौंड (आरंभ पर्व) : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावातील विकास कामे तसेच तालुकास्तरीय समितीने ग्रामपंचायत गोपाळवाडी येथे प्रत्यक्ष पाणी करून गावातील अनेक विकास कामांना भेट देण्यात आली या समितीमध्ये प्रामुख्याने सर्जेराव पाटील गटविकास अधिकारी, विनोद मिंडे विस्तार अधिकारी, महेश काळे विस्ताराधिकारी, नरेश भोनकर विस्ताराधिकारी, हरीश आहेर बीएम आधी या समितीमध्ये होते, यावेळी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पोळ, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब निवगुणे, पंचायत समिती सदस्य सुमन निकाळजे, गोपाळवाडीच्या सरपंच स्वातीताई राजू पवार, गोपाळवाडी गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, माजी सरपंच वैशालीताई शिंदे, जयसिंग दादा दरेकर, सीमाताई बोरावके, माजी चेअरमन बाळासाहेब गिरमे ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड, राजू पवार,सर्व अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, आधी सह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते, यावेळी गोपाळवाडी ग्रामपंचायतिचे आलेल्या कमिटी कडून कौतुक करण्यात आले आणि अशाच पद्धतीने पुढील कामकाज चालेल अशी अपेक्षा व्यक्त केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर टेकवडे यांनी केले.

### भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत मजबूत कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेरच्या चौथ्या तिमाहीत मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली. कंपनीचा एकत्रित महसूल 55,383 कोटी रुपये झाला असून त्यात वार्षिक 15.7 टक्के वाढ झाली आहे. भारतातील मोबाईल व्यवसायात चांगली वाढ झाली असून एआरपीयू 257 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय, कंपनीने या तिमाहीत 2,426 नवीन टॉवर्स आणि 16,746 मोबाईल ब्रॉडबँड बेस स्टेशन उभारले. तसेच एअरटेलने 65 कोटी ग्राहकांचा टप्पा पार करत जगातील दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम कंपनी म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. कंपनीचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन गोपाल विट्ठल यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष 2026 हे एअरटेलसाठी अत्यंत महत्त्वाचे वर्ष ठरले. कंपनीने डेटा सेंटर व्यवसायाचा विस्तार केला असून डिजिटल फायनान्स, क्लाऊड सेवा आणि एआय तंत्रज्ञान क्षेत्रातही मोठी प्रगती केली आहे. भविष्यात मजबूत डिजिटल नेटवर्क उभारणी आणि स्वच्छ ऊर्जेवर कंपनीचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारतातील मोबाईल व्यवसायात 58 लाख नवीन स्मार्टफोन ग्राहक आणि 8 लाख पोस्टपेड ग्राहकांची भर पडली आहे. होम्स, आयपीटीव्ही आणि एअरटेल व्यवसाय विभागातही चांगली वाढ झाली. भविष्यातील गुंतवणूक आणि दीर्घकालीन वाढीसाठी टॅरिफमध्ये आणखी सुधारणा होणे आवश्यक असल्याचे मतही गोपाल विट्ठल यांनी व्यक्त केले.

### एचडीएफसी बँकेच्या व्हॉट्सअॅप चॅट बँकिंगने पूर्ण केला १ कोटीचा टप्पा

पुणे (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँकेच्या व्हॉट्सअॅप चॅट बँकिंग मंचाने त्यांच्या वापरातील एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या मंचाच्या माध्यमातून ३० दिवसातील अॅक्टिव्ह युझर्स ची संख्या ही १ कोटी तर ९० दिवसांतील अॅक्टिव्ह युझर्स ची संख्या ही ३१ मार्च २०२६ रोजी २ कोटी पेक्षा अधिक झाली आहे. आता या मंचाचे ४ कोटींहून अधिक नोंदणीकृत ग्राहक असून ही संख्या बँकेच्या एकूण ग्राहक संख्येच्या जवळजवळ ४० टक्के आहे. वापरकर्त्यांमधील वाढीसह व्यवहारातही २० टक्क्यांनी वाढ झाल्याने अधिकाधिक लोकांची आवड यातून दिसून येते. आज एचडीएफसी बँके कडून व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून सर्वाधिक सर्वसमावेशक सेवा देण्यात येतात. १९ विविध उत्पादनां सह २२५ सेवा या मंचावरुन देण्यात येत असून रोजच्या बँकिंग गरजांसह व्यवहार आणि आठवण करुन देण्यास योग्य सेवांचे अलर्ट्स देण्यात येतात. परिणामी ही सेवा क्षेत्रातील अत्याधुनिक संभाषणात्मक बँकिंग सेवा पध्दतीं पैकी एक ठरली आहे. एचडीएफसी बँकेने सुरुवातीलाच ओळखले होते की, संवादात्मक इंटरफेस हे केवळ साध्या संवादांपुरते मर्यादित न राहता, खरेदी, जेवण मागवणे आणि दैनंदिन व्यवहारांसारख्या व्यापारासाठी शक्तिशाली प्लॅटफॉर्म म्हणून विकसित होत आहेत. हा बदल ओळखून, बँकेने २०२२ मध्ये चॅट बँकिंग सुरू केले आणि त्याला मूलभूत बँकिंग गरजांसाठी एक सोयीस्कर सेवा माध्यम म्हणून स्थापित केले, तसेच बँकिंगला थेट ग्राहकांच्या दैनंदिन डिजिटल सवयींमध्ये आणले. उत्पादनांचा स्वीकार वाढवण्यासाठी, बँकेने सातत्याने नाविन्यपूर्ण उत्पादन रचनेवर लक्ष केंद्रित केले आहे. बँकेने उद्योगात प्रथमच वापरल्या जाणाऱ्या अनेक सुविधा सादर केल्या आहेत, ज्यात व्हॉइस नोट वर आधारित इनपुटचा समावेश आहे, ज्यामुळे ग्राहक हिंदी, इंग्रजी किंवा हिंग्लिशमध्ये सहजपणे संवाद साधू शकतात. तसेच, कोअर बँकिंग सिस्टीममधून इंटीग्रेटेड सर्व्हिस अलर्ट्स सक्षम करणाऱ्या जागतिक स्तरावरील पहिल्या काही बँकांपैकी ही एक सेवा आहे, जिथे अधिक गुंतागुंतीच्या प्रश्नांसाठी एआय-शक्तीवर चालणारे बॉट्स आणि मानवी एजंट यांचा एकत्रित उपयोग केला जातो. सोपेपणात अधिक भर घालण्यासाठी बँकेने प्रथमच कनेक्ट टू आरएम वैशिष्ट्य सुरु केले, यामुळे ग्राहक रिलेशनशिप मॅनेजरची माहिती पाहून कॉलबॅक करण्याची विनंती लगेच करु शकतील. नुकतीच त्यांनी क्विक एफडी आणि कन्व्हर्ट टू ईएमआय सारख्या स्थानिक प्रवासाची सुरुवात केली असून यामुळे संपूर्ण प्रक्रिया ही केवळ तीन टप्प्यात होऊन किमान ड्रॉप ऑफ्स मध्ये काम होऊ शकते.

## व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटीची दमदार वाढ

FY26 मध्ये EBITDA मध्ये 28% वाढ



पुणे (दै. आरंभ पर्व)

Ventive Hospitality Limited ने 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या चौथ्या तिमाही (Q4 FY26) आणि संपूर्ण आर्थिक वर्ष FY26 चे एकत्रित आर्थिक निकाल जाहीर करत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीच्या महसूल, EBITDA आणि नफ्यात लक्षणीय वाढ झाली असून, विशेषतः करानंतरच्या नफ्यात (PAT) विक्रमी वाढ दिसून आली आहे. Q4 FY26 मध्ये कंपनीने ₹870 कोटींचे एकत्रित उत्पन्न नोंदवले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 21 टक्क्यांनी अधिक आहे. या तिमाहीत कंपनीचा EBITDA ₹476 कोटी राहिला असून त्यात 28 टक्क्यांची वाढ झाली आहे. EBITDA मार्जिन 55 टक्क्यांवर पोहोचले असून त्यात 3 टक्के अंकांची वाढ झाली आहे. कंपनीचा करानंतरचा नफा (PAT) ₹259 कोटी राहिला, जो मागील वर्षाच्या तुलनेत 72 टक्के अधिक आहे. संपूर्ण आर्थिक वर्ष FY26 मध्ये कंपनीचे एकत्रित उत्पन्न ₹2,666 कोटी झाले असून त्यात 24 टक्क्यांची वाढ झाली आहे. वार्षिक EBITDA ₹1,299 कोटी राहिला, जो 28 टक्क्यांनी वाढला आहे. EBITDA मार्जिन 49 टक्के राहिले. कंपनीचा पूर्ण वर्षाचा PAT ₹502 कोटींवर पोहोचला असून FY25 मधील ₹48 कोटींच्या तुलनेत त्यात तब्बल 939 टक्क्यांची वाढ झाली आहे. FY25 चे तुलनात्मक आकडे प्रोफॉर्मा आधारावर देण्यात आले आहेत. कंपनीच्या हॉस्पिटॅलिटी व्यवसायातून Q4 FY26 मध्ये ₹658 कोटींचे उत्पन्न मिळाले, ज्यामध्ये 13 टक्क्यांची वाढ झाली. हॉस्पिटॅलिटी EBITDA ₹295 कोटी राहिला असून त्यात 9 टक्के वाढ झाली आहे. EBITDA मार्जिन 45 टक्के राहिले. भू-राजकीय तणाव आणि प्रवास निर्बंधांमुळे या तिमाहीत हॉस्पिटॅलिटी व्यवसायाच्या महसूल आणि मार्जिनवर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे कंपनीने नमूद केले.

## सॅमसंगकडून ‘उद्याचा मार्ग शोधा’ची घोषणा

पुणे (दै. आरंभ पर्व)

सॅमसंग ने आपल्या प्रमुख नवोन्मेष आणि शिक्षण उपक्रम ‘उद्याचा मार्ग शोधा’च्या पाचव्या पर्वाची घोषणा केली आहे. भारतातील तरुण नवोन्मेषकांना वास्तवातील सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यंदा विजेत्या संघांसाठीच्या अनुदानाची रक्कम दुप्पट करून तब्बल २ कोटी रुपये करण्यात आली आहे. भारतामध्ये कंपनीची ३० वर्षे पूर्ण होत असताना हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित जीवनशैली, आरोग्य व शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता तसेच क्रीडा व तंत्रज्ञान या चार प्रमुख विषयांवर १४ ते २२ वयोगटातील विद्यार्थी आपले अभिनव प्रकल्प सादर करू शकतील. यंदाच्या पर्वातील सर्वोत्तम चार विजयी संघांना भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली येथे उद्योजकीय संवर्धन सहाय्यासह २ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाईल. तसेच सर्वोत्तम २० संघांना २० लाख रुपये, तर सर्वोत्तम ४० संघांना




८ लाख रुपये आणि सॅमसंगची उपकरणे दिली जाणार आहेत.

सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नमुना निर्मिती सहाय्य, तज्ज्ञ मार्गदर्शन, गुंतवणूकदारांशी संवाद, निवासी प्रशिक्षण शिबिरे तसेच देशभरातील १०० शहरांमध्ये रचनात्मक विचार कार्यशाळांचा लाभ मिळणार आहे. याशिवाय दोन लाख चाळीस हजार तासांहून अधिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सॅमसंग दक्षिण-पश्चिम आशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जे. बी. पार्क म्हणाले, “गेल्या तीन दशकांपासून भारताच्या डिजिटल आणि नवोन्मेष प्रवासात सहभागी होण्याचा आम्हाला अभिमान आहे. ‘उद्याचा मार्ग शोधा’ हा उपक्रम तरुणांना वास्तविक समस्यांवर परिणामकारक उपाय शोधण्यासाठी सक्षम करत आहे. यंदाच्या पर्वातून आम्ही शाळा आणि महाविद्यालयांपर्यंत अधिक व्यापक पोहोच साधत आहोत.”

भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्रा. अजय कुमार सूद यांनी सांगितले की, “भारतामधील तरुण नवोन्मेषक जागतिक समस्यांवरही परिणामकारक उपाय शोधत आहेत. अशा उपक्रमांमुळे भविष्यातील उद्योजक आणि संशोधकांची मजबूत साखळी निर्माण होत आहे.”

भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्लीचे संचालक प्रा. रंगन बनर्जी यांनी सांगितले की, “विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तांत्रिक मार्गदर्शन, आंतरशाखीय संशोधन आणि नमुना निर्मितीची संधी मिळाल्यास ते स्थानिक तसेच जागतिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करू शकतात.”

प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या संचालक डॉ. सपना पोती म्हणाल्या, “ज्ञानाधारित आणि नवोन्मेषप्रधान भारत घडविण्यासाठी तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे अत्यावश्यक आहे.”

या उपक्रमासाठी अर्ज प्रक्रिया ७ मे ते ३ जुलै २०२६ या कालावधीत खुली राहणार आहे. त्यानंतर प्रत्येक विषयातून २५ अशा एकूण १०० संघांची निवड करण्यात येईल. पुढील टप्प्यांमध्ये चित्रफीत सादरीकरण, प्रत्यक्ष मार्गदर्शन, प्रात्यक्षिक निर्मिती आणि निवासी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातील.

उपांत्य फेरीतील विद्यार्थ्यांना सॅमसंगच्या बंगळुरू, नोएडा आणि दिल्ली येथील संशोधन व विकास केंद्रांना भेट देण्याची संधी मिळेल. अंतिम फेरीसाठी निवडलेल्या २० संघांना गुंतवणूकदारांशी भेट, सादरीकरणे आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे.



### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत

## विकासकामांची समितीकडून पाहणी

### स्वामी चिंचोली गावात पथकाने दिली भेट

दौंड (दै. आरंभ पर्व)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत स्वामी चिंचोली (ता. दौंड) गावात करण्यात आलेल्या विविध विकासकामांची तालुकास्तरीय समितीने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तपासणी केली. यावेळी समिती सदस्यांचे गावकऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी, हलगी ताशांच्या गजरात स्वागत केले. उरणचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांच्या हस्ते “मुख्यमंत्री पंचायतराज शाश्वत विकास कामे” या फलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

तालुकास्तरीय समितीने प्रभू श्रीराम मंदिरात दर्शन घेऊन गावातील विकासकामांच्या पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात समिती सदस्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर समितीने दप्तर तपासणीसह गावातील विविध विकासकामांची पाहणी केली. प्रामुख्याने सौरऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजना, वृक्षलागवड, सीसीटीव्ही कॅमेरे, घरकुल योजना, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी, प्राथमिक शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर तसेच ओढा खोलीकरण आदी कामांचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान गावच्या प्रशासक सरपंच पुनम मदने, उपसरपंच प्रकाश होले, ग्रामपंचायत अधिकारी स्वाती लोंढे, विस्तार अधिकारी बागडे साहेब, सदस्य जयराम नाहणे, पद्माकर कांबळे, संचालक मच्छिंद्र मदने, तलाठी अजित पाटील, कृषी सहाय्यक शंकर कांबळे, मुख्याध्यापक दीपक वाघ, आशा सेविका, ग्रामस्थ, कर्मचारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## यूडब्ल्यूए इंडियाकडून ऐतिहासिक वार्षिक शिष्यवृत्ती कटिबद्धतेची घोषणा

पुणे (दै. आरंभ पर्व)

University of Western Australia (यूडब्ल्यूए) यांनी यूडब्ल्यूए इंडियाच्या माध्यमातून ऐतिहासिक शिष्यवृत्ती प्रोग्रामची घोषणा केली आहे. भारतातील विद्यार्थ्यांसाठी ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्वतंत्र शिष्यवृत्ती कटिबद्धता मानली जात आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक-आर्थिक आणि प्रादेशिक पार्श्वभूमी असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे व्हाइस-चान्सलर प्रोफेसर Amit Chakma म्हणाले, “या ऐतिहासिक घोषणेमधून भारताप्रती यूडब्ल्यूएची सखोल आणि कायमस्वरूपी कटिबद्धता दिसून येते. आर्थिक मर्यादांमुळे विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षेमध्ये अडथळा येऊ नये, यासाठी आम्ही जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त शिक्षण अधिक व्यापक करण्यावर भर देत आहोत. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक करिअरसाठी सक्षम बनविणे हे आमचे ध्येय आहे.”

यूडब्ल्यूए इंडियासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून मुंबई आणि चेन्नई येथील कॅम्पसमध्ये एसटीईएम, व्यवसाय आणि तंत्रज्ञान विषयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे अभ्यासक्रम जागतिक उद्योगांच्या मागणीसह भारतातील बदलत्या कार्यबलाच्या गरजांशी सुसंगत असतील. अधिक माहितीसाठी विद्यार्थी यूडब्ल्यूए इंडिया अधिकृत संकेतस्थळ ला भेट देऊ शकतात. या बहु-स्तरीय शिष्यवृत्ती आराखड्यात शिक्षण शुल्कातील सवलतीसह शैक्षणिक गुणवत्ता, आर्थिक गरज, नेतृत्व क्षमता आणि प्रादेशिक समावेशकता यांचा विचार करण्यात आला आहे. या प्रोग्राममध्ये गुणवत्ता शिष्यवृत्ती, जागतिक उत्कृष्टता शिष्यवृत्ती, इक्विटी आणि सीएसआर-समर्थित निधी, राज्य सरकारांच्या सहयोगातून उपलब्ध संधी तसेच माजी विद्यार्थ्यांच्या पाठबळावर आधारित शिष्यवृत्तींचा समावेश आहे. प्रारंभी महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्यांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी होणार आहे.

## कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड जिल्हा पुणे

### निविदा सुचना

खालील कामांच्या सिलबंद निविदा/कोटेशन सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड ता. दौंड जिल्हा पुणे हे अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन/पुरवठादारांकडुन मागवित आहेत. प्लॅन, इस्टीमेट प्रत व कामांची माहिती कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड यांचे मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत बुधवार सुट्टीचा दिवस सोडुन देण्यात येईल. प्लॅन, इस्टीमेट प्रत दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत देण्यांत येईल. निविदा/कोटेशन दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत स्विकारले जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | दौंड मुख्यबाजार आवाराचे क्राँक्रीटीकरण | ३५६९९२/- | १ महिना |
| २ | उपबाजार आवार केडगांव क्राँक्रीटीकरण | १६९९६१/- | १ महिना |

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकिय कंत्राटात होणारा बदल याबाबतचे दि.१९/०७/२०१८ मधील परिपत्रकातील सुचनांचे पालन करावे. (संकेतांक क्रमांक २०१७०८२१११०८४६८००५)
२. मंजुर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त दराच्या निविदा मान्य करण्यात येणार नाहीत.
३. अंदाजपत्रकामध्ये जोडलेल्या नकाशा प्रमाणे व स्पेसिफिकेशन प्रमाणे कामे करावीत.
४. प्रत्यक्ष झालेल्या कामाची मोजमापे घेतल्यानंतर समितीच्या आर्किटेक्ट इंजिनियर यांच्या सर्टिफिकेट नुसारच बीले सादर करावीत. कुठल्याही सबबीवर कामापोटी अॅडव्हान्स मिळणार नाही.
५. कामे निवीदेतील नमुद मुदतीत पुर्ण करावीत.
६. बीलाच्या जी.एस.टी. ची रक्कम भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
७. ठेकेदारांनी गौणखनिजाची वाहतुक ही मंजुर गटातुनच करावी व त्यासाठी आवश्यक रॉयल्टी कामापुर्वीच अदा करावी.
८. मा. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड यांची परवानगी स्वाक्षरी असलेल्याच निविदा/कोटेशन दाखल करुन घेतल्या जातील.
९. कोणाचीही निविदा/कोटेशन अथवा सर्व निविदा/कोटेशन कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार समिती राखून ठेवीत आहे.

स्वाक्षरी /- श्री. मोहन लक्ष्मण काटे, सचिव
स्वाक्षरी /- श्री. शरद बापु कोळपे, उपसभापती
स्वाक्षरी /- श्री. गणेश अंकुश जगदाळे, सभापती

## ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे

### इ-१ पेपर नोटिस क्र. २ सन २०२५ - २०२६


ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी-१ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषदकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमूना ग्रामपंचायत दापोडी तालुका दौंड जिल्हा पुणे यांच्याकडून दिनांक १५/०५/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक १५/०५/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी ग्रामपंचायतच्या सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ठेकेदाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | दापोडी अंतर्गत गटर करणे | २,११,२६६ | २०० | सूट | सु.बे. अभियंता |
| २. | दापोडी स्मशान भूमी देखभाल दुरुस्ती करणे | ९४,२३९ | २०० | सूट | सु.बे.अभियंता |
| ३. | दापोडी गावठाण अंतर्गत गटर करणे | २,००,००० | २०० | सूट | सु.बे. अभियंता |
| ४. | प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारत वॉल कम्पाउंड करणे | ४,२०,००० | २०० | सूट | सु.बे. अभियंता |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत दापोडी पीडीसीसी बँक शाखा केडगाव खाते क्रमांक ०२२००२५०००००१४ वर किंवा ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणेकामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत दापोडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा केडगाव खाते क्रमांक ०२२००२५०००००१४ च्या खाती भरण्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश डीडी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिकी लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदाबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करण्याचा तसेच कोणतीही निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायत दापोडी यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरी /- सरपंच, ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे
स्वाक्षरी /- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत दापोडी ता. दौंड जि. पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे



### मेडिकव्हर हॉस्पिटल येथे परिचारिका दिन २०२६ उत्साहात साजरा

भोसरी (आरंभ पर्व) : मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. रुग्णसेवा, आपत्कालीन वैद्यकीय मदत आणि आरोग्य व्यवस्थेमध्ये परिचारिकांचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या समर्पणाचा गौरव करण्यात आला. "आवर नर्सेस, आवर फ्युचर – एम्पॉवर्ड नर्सेस सेव्ह लाइव्ह्स" या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन हॉस्पिटलच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे, हॉस्पिटल व्यवस्थापन, डॉक्टर्स, परिचारिका कर्मचारी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका नम्रताताई लोंढे उपस्थित होत्या, तर प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. कीर्ती माने यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. यावेळी डॉ. पवन वाखरे, डॉ. श्रीरंग कुलकर्णी, डॉ. वर्षा रांगेरी आणि डॉ. दत्तात्रय कुलकर्णी हे मान्यवरही उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना गीत, स्वागतपर भाषण आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विविध मान्यवरांनी परिचारिकांच्या अथक सेवाभावाचे कौतुक करत आरोग्य व्यवस्थेमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. रुग्णांच्या उपचारांबरोबरच मानसिक आधार देण्यातही परिचारिका महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले.



### निवडीबद्दल गायकवाड यांचा सत्कार

पुणे (आरंभ पर्व) : पुणे भाजपा ओबीसी मोर्चा सरचिटणीस पदी रमेश बापू गायकवाड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा श्री शिवशंभू चरित्र अभ्यासक निलेश भिसे व मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. खडकवासला गावचे सुपुत्र असलेले रमेश गायकवाड हे भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेत पक्षासाठी सातत्याने योगदान देत आले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांना उपाध्यक्ष पदावरून बढती देत नुकतीच भाजपा ओबीसी मोर्चाच्या सरचिटणीसपदी निवड केली आहे. यावेळी श्री शिवशंभु चरित्र अभ्यासक, लेखक, व्याख्याते निलेश भिसे, हिंदुत्ववादी कार्यकर्तेॲड. अक्षय उत्तेकर भाजपा पुणे जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते तसेच उद्योजक नितीन गोरे उपस्थित होते.

### राज्यात मोठा कायदेशीर बदल

पुणे (आरंभ पर्व) : विधी व न्याय विभागाने अधिसूचना जारी करून १ मेपासून राज्यातील सर्व दिवाणी व जिल्हा न्यायालयाचे ट्रस्ट किंवा धर्मादाय संस्थांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संपुष्टात आणले आहेत. सुमारे दीडशे वर्षे अनेक धार्मिक ट्रस्टचे विश्वस्त म्हणून पदसिद्ध नियुक्ती झालेले अनेक न्यायिक अधिकारी आजमितीस संपूर्ण राज्यात कार्यरत आहेत. या अधिसूचनेमुळे हे सर्व अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या विविध तरतुदींप्रमाणे राज्यातील धर्मादाय आस्थापनेतील अधिकाऱ्यांकडे आले आहेत. राज्य विधिमंडळाने हिवाळी अधिवेशनात ट्रस्ट कायद्यात आमूलाग्र बदल करण्याच्या विधेयकाला मंजुरी दिली होती.

# भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. फ. मुं. शिंदे

## आमदार राहुलदादा कुल यांच्या हस्ते उद्घाटन





**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद आणि भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. मुं. शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच संमेलनाचे उद्घाटन दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांनी दिली.

हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दि. २३ व २४ मे २०२६ रोजी केडगाव चौफुला येथे आयोजित करण्यात आले आहे. संमेलनास महादेव जानकर तसेच मंदार फणसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. रोहन खवटे असून, निमंत्रक डॉ. भरत खळदकर आहेत. सहनिमंत्रक म्हणून रामभाऊ नातू कार्यरत आहेत. संमेलनाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीस प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुळीक, सचिव दिपक पवार, सदस्य कैलास शेलार, राजाभाऊ जगताप, रामचंद्र नातू, तसेच महाराष्ट्र राज्य तमाशा थिएटर मालक संघटनेचे अध्यक्ष डॉ. अशोक जाधव, विनायक कांबळे, दत्तात्रय डाडर, रानकवी जगदीश वनशिव, भाऊसाहेब फडके, नितीन भागवत, आनंदा बारवकर, सुशांत जगताप आणि अरविंद जगताप आदी उपस्थित होते. या दोन दिवसीय साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, जलाभिषेक, उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, कथाकथन, नाट्यप्रयोग, परिसंवाद, कविसंमेलन तसेच समारोप समारंभ असे विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

प्रा. फ. मुं. शिंदे यांची समृद्ध साहित्यसंपदा प्रा. फ. मुं. शिंदे यांनी गेली पन्नास वर्षे मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. 'अवशेष', 'आदिम', 'आयुष्य वेचताना', 'कालमान', 'गणगौळण', 'जुलूस', 'फकिराचे अभंग', 'निरंतर', 'निर्वासित नक्षत्र', 'प्रार्थना', 'मिथक', 'लाकडाची फुले', 'लोकगाणी', 'वृंदगान', 'सूर्यमुद्रा' आणि 'स्वान्त' यांसारख्या अनेक गाजलेल्या साहित्यकृती त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांनी अनेक मराठी चित्रपटांसाठी गीतलेखनही केले आहे.

त्यांचे २७ कविता संग्रह, तीन समीक्षासंग्रह, विनोदी गद्यसंग्रह, राजकीय उपहासिका, बुद्धजीवनावरील एकांकिका संग्रह तसेच हिंदी नाटक 'क्रांतिबा फुले'चा मराठी अनुवाद प्रकाशित झाला आहे. उत्कृष्ट काव्यलेखनासाठी त्यांना महाराष्ट्र शासनाचा सलग तीन वेळा 'कवी केशवसुत पुरस्कार' मिळाला असून, समीक्षालेखन, विनोदपर लेखन आणि एकांकिका लेखनासाठीही त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. तसेच पुणे मसापचा 'कवी यशवंत पुरस्कार', 'भा. रा. तांबे पुरस्कार', 'दमाणी पुरस्कार', 'प्रियदर्शनी साहित्य पुरस्कार' आणि 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुरस्कार' यांसारखे मानाचे पुरस्कारही त्यांनी प्राप्त केले आहेत.

सासवड येथे पार पडलेल्या ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. त्यांच्या साहित्यकृतींचा समावेश राज्यातील विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात करण्यात आला असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मराठी अभ्यासक्रमात 'सूर्यमुद्रा' या काव्यसंग्रहाचाही समावेश करण्यात आला आहे.

# सिंहगड रोडवर अभिरुची परिसरात नागरिकांसाठी पादचारी पूल उभारण्याची मागणी !

## अपघाताची दुर्घटना टाळण्यासाठी पादचारी पूल गरजेचा : निलेश गिरमे



छाया : मा. अभिषेक मरगळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील अत्यंत वर्दळीच्या अभिरुची मॉल परिसरात पादचारी पूल उभारण्यात यावा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

अभिरुची मॉल, डी-मार्ट, अभिरुची पोलीस चौकी, हवेली पोलीस चौकी तसेच विविध व्यावसायिक आस्थापनांमुळे या परिसरात दिवसभर नागरिकांची आणि वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे रस्ता ओलांडताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सकाळ व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना जीव धोक्यात घालून रस्ता पार करावा लागत असल्याचे चित्र आहे. मध्यंतरी मागील आठवड्यामध्ये अपघाताची एक दुर्घटना टळली.. मात्र भविष्यामध्ये अपघात होण्याची शक्यता ना करता येत नाही. वाहनांची वाढती संख्या आणि वेगवान वाहतूक यामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे. अनेकदा किरकोळ अपघात व धोकादायक प्रसंग घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अभिरुची परिसरात तातडीने पादचारी पूल उभारण्यात यावा, अशी मागणी युवा सेना शहर प्रमुख निलेश गिरमे यांनीही पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे केली आहे. तसेच प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



सिंहगड रोड परिसरातील नागरिक, अभिरुची मॉल परिसरात येतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना सोईस्कर असा पादचारी पूल उभारण्याची गरज आहे..

**- श्री. निलेश गिरमे, अध्यक्ष युवा सेना पुणे शहर**



सिंहगड रोड वर्दळीचा भाग असल्याने तिथे पादचारी पूल गरजेचा आहे. परंतू तिथे अनधिकृत हातगाड्या आणि रस्त्याच्या कडेला वाहने लागलेली असतात. त्यावर नियंत्रण आल्यास नक्कीच कोंडी कमी होईल.

**- मा. प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक, दै. आरंभ पर्व**

## शहाजी फुरडे-पाटील यांना "भागवत धर्म प्रसारक" पुरस्कार जाहीर



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

गेली अनेक वर्षे वारकरी संप्रदाय, पालखी सोहळे आणि भागवत धर्माचा विचार आपल्या प्रभावी लेखणीतून जनसामान्यांपर्यंत पोहोचविणारे ज्येष्ठ पत्रकार शहाजी फुरडे-पाटील यांना सन २०२६ चा प्रतिष्ठेचा "भागवत धर्म प्रसारक" पुरस्कार जाहीर झाला आहे. वारकरी परंपरेचा जिव्हाळ्याने अभ्यास करत समाजमनात भक्ती, संस्कार आणि वारीचे महत्त्व रुजविणाऱ्या फुरडे-पाटील यांच्या कार्याचा हा मानाचा गौरव मानला जात आहे. पंढरपूर व जळगाव येथील श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या वतीने हा पुरस्कार दरवर्षी पालखी सोहळ्यात उल्लेखनीय वार्तांकन करणाऱ्या आणि भागवत धर्माच्या प्रचार-प्रसारासाठी विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांना प्रदान केला जातो. संस्थेचे माजी अध्यक्ष सहकार महर्षी कै. भाऊसाहेब ऊर्फ प्रल्हादराव पाटील यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप श्री विठ्ठलाची मूर्ती, मानाचा वारकरी फेटा, शाल, श्रीफळ आणि संत मुक्ताबाई चरित्र ग्रंथ असे आहे. संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या पुरस्काराची घोषणा केली. लोकमतचे बार्शी तालुका प्रतिनिधी म्हणून गेली वीस वर्षे कार्यरत असलेले शहाजी फुरडे-पाटील यांनी पत्रकारितेसोबतच वारकरी संप्रदायाशी असलेली नाळ अखंड जपली आहे. बार्शी तालुक्यातील कांदलगाव येथील रहिवासी असलेल्या फुरडे-पाटील यांनी मागील तब्बल १८ वर्षांपासून पालखी मार्गावरील वारीचे सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण वार्तांकन केले आहे. त्यांच्या लेखणीतून केवळ वारीतील भक्तिभावच नव्हे, तर वारकऱ्यांच्या अडचणी, सामाजिक प्रश्न, धार्मिक परंपरा आणि मूलभूत सुविधांचे प्रश्नही प्रभावीपणे मांडले गेले.

# तरूणांनो मुलीला सुरक्षित आयुष्य द्या

## मोठे लग्नसोहळे टाळत कोर्ट मॅरेज उत्तम पर्याय

### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

समाज बदलत आहे आणि त्या बदलासोबत विवाहसंस्थेकडे पाहण्याची दृष्टीही बदलणे आवश्यक आहे. कोर्ट मॅरेजसारख्या साध्या आणि कायदेशीर पर्यायाचा स्वीकार करून आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम, जबाबदार आणि प्रगत समाज निर्माण करू शकतो. मुलीच्या सुरक्षित आणि सन्मानजनक आयुष्यासाठी मोठ्या लग्नसोहळ्यांपेक्षा विचारपूर्वक घेतलेला साधेपणाचा निर्णय अधिक मौल्यवान ठरू शकतो.



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या आधुनिक आणि वेगाने बदलणाऱ्या समाजात विवाहसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात बदलत आहे. एकेकाळी लग्न म्हणजे प्रतिष्ठेचा प्रश्न, समाजातील मानमरातब दाखवण्याचे माध्यम आणि हजारो पाहुण्यांच्या उपस्थितीत होणारा भव्य सोहळा अशी धारणा होती. मात्र, बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे, वाढत्या महागाईमुळे आणि समाजातील वास्तव पाहता आता अनेक कुटुंबे साधेपणाने विवाह करण्याकडे वळताना दिसत आहेत. विशेषतः मुलीच्या आई-वडिलांनी दिखाऊ लग्नसमारंभापेक्षा मुलीच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षिततेला प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे.

आज अनेक कुटुंबे मुलीच्या लग्नासाठी लाखो रुपये खर्च करतात. विवाह मंडप, केटरिंग, सजावट, बँड, डीजे, महागडे कपडे, दागिने, फोटोग्राफी, पाहुणचार आणि विविध कार्यक्रम यासाठी प्रचंड खर्च केला जातो. काही वेळा हा खर्च भागवण्यासाठी कर्ज घ्यावे लागते, जमिनी विकाव्या लागतात किंवा आयुष्यभराची बचत खर्च करावी लागते. लग्नाचा सोहळा दोन-तीन दिवसांचा असतो, पण त्याचे आर्थिक ओझे अनेक वर्षे कुटुंबाला सहन करावे लागते. ही वस्तुस्थिती अनेकांना माहीत असूनही "लोक काय म्हणतील?" या मानसिकतेमुळे खर्चाची स्पर्धा सुरूच असते.

याउलट, कोर्ट मॅरेज हा कायदेशीरदृष्ट्या पूर्णपणे वैध, साधा, कमी खर्चिक आणि सुरक्षित पर्याय आहे. कोर्ट मॅरेजमध्ये अनावश्यक दिखावा नसतो. दोन्ही कुटुंबांच्या संमतीने आणि कायद्याच्या चौकटीत विवाह नोंदणी केली जाते. यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक ताण मोठ्या प्रमाणात वाचतो. विशेष म्हणजे, लग्नावर खर्च होणारी रक्कम मुलीच्या शिक्षणासाठी, घरासाठी, व्यवसायासाठी किंवा भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी वापरता येते.

समाजात अनेक वेळा असे दिसून येते की, भव्य लग्नसोहळा करूनही काही महिन्यांत संसारात मतभेद निर्माण होतात. मोठा खर्च म्हणजे सुखी संसाराची हमी नसते. संसार टिकवण्यासाठी परस्पर विश्वास, समजूतदारपणा, प्रेम आणि जबाबदारीची भावना महत्त्वाची असते. त्यामुळे लग्नाचा दिखावा करण्यापेक्षा मुला-मुलींच्या स्वभावाची जुळवाजुळव आणि त्यांच्या भविष्यासाठी योग्य नियोजन अधिक गरजेचे आहे.

मुलीच्या पालकांसाठी हा विषय अधिक संवेदनशील असतो. अनेक पालक मुलीच्या लग्नासाठी आयुष्यभर पैसा साठवतात. पण लग्नानंतर जर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, तर त्याच मुलीला आधार देण्यासाठी त्यांच्याकडे काहीच उरत नाही. म्हणूनच आजच्या काळात मुलीच्या नावावर बचत, विमा, घर, शिक्षण किंवा व्यवसायासाठी निधी तयार करणे अधिक उपयुक्त ठरते. कोर्ट मॅरेज करून वाचवलेले लाखो रुपये मुलीच्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी मोठा आधार बनू शकतात.

साध्या विवाहाला आता समाजातही स्वीकार मिळू लागला आहे. अनेक सुशिक्षित तरुण-तरुणी फाजील खर्च टाळून साधेपणाने विवाह करण्याचा निर्णय घेत आहेत. काहीजण मंदिरात, काहीजण नोंदणी कार्यालयात, तर काहीजण अगदी मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत विवाह करून समाजासमोर आदर्श निर्माण करत आहेत. हा बदल सकारात्मक असून तो समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठीही महत्त्वाचा आहे.

भव्य लग्नसोहळ्यांमध्ये अनेकदा अन्नाची नासाडी, ध्वनीप्रदूषण आणि अनावश्यक दिखावा पाहायला मिळतो. काही वेळा लग्न म्हणजे स्पर्धेचे व्यासपीठ बनते. कोणाचा मंडप मोठा, कोणाचे कपडे महाग, कोणाच्या लग्नात प्रसिद्ध कलाकार आले अशा गोष्टींवर भर दिला जातो. या स्पर्धेमुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर मानसिक दबाव वाढतो. परिणामी अनेक कुटुंबे आपल्या आर्थिक क्षमतेपलीकडे खर्च करतात.

कोर्ट मॅरेज ही केवळ खर्च वाचवण्याची बाब नाही, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही आहे. साध्या विवाहामुळे समाजात सकारात्मक संदेश जातो की, विवाह हा दोन व्यक्ती आणि दोन कुटुंबांचा पवित्र संबंध आहे, तो दिखाव्याचा कार्यक्रम नाही. यामुळे तरुण पिढीमध्येही वास्तववादी विचारसरणी विकसित होण्यास मदत होते.

आज गरज आहे ती समाजाची मानसिकता बदलण्याची. "मोठं लग्न म्हणजे प्रतिष्ठा" ही विचारसरणी मागे पडली पाहिजे. पालकांनी मुलीच्या आनंदाला, शिक्षणाला आणि सुरक्षित भविष्यास अधिक महत्त्व दिले पाहिजे. लाखो रुपये एका दिवसाच्या दिखाव्यावर खर्च करण्यापेक्षा तेच पैसे मुलीच्या आयुष्याला स्थैर्य देण्यासाठी वापरणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

## सपना दुर्गम पाड्यातून थेट सातासमुद्रापार गगनभरारी!



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर-पुणे येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात राहून शिक्षण घेणारी विद्यार्थिनी सपना राजेश वाघमारे हिचा एलएलएम (LLM) साठी युनायटेड किंगडम (UK) मधील जागतिक स्तरावरील दोन नामांकित विद्यापीठांतील प्रवेश निश्चित झाला आहे. युनिव्हर्सिटी ऑफ लीड्स (University of Leeds)तसेच क्वीन मेरी युनिव्हर्सिटी, यूके (QueenMary university) येथे उच्च शिक्षणासाठी निवड झालेली सपना आदिवासी समाजातील असून एका दुर्गम भागातील विद्यार्थिनी आहे.तिचे तिने जागतिक स्तरावर झेप घेतल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.तिचे सध्याचे शिक्षण (B.A.L.L.B) आहे.वाघमारे ही रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कोलाड येथील रहिवासी असून ती कातकरी समाजातील आहे. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थिती, मर्यादित साधने आणि अनेक अडचणींवर मात करत तिने हे यश संपादन केले आहे. मोलमजुरी करून मुलीला शिक्षण देणाऱ्या तिच्या पालकांसाठी तसेच आदिवासी विकास विभागासाठी ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब ठरली आहे.

## दैनिक आरंभपर्व कार्यालयाला प्रशांत मते यांची सदिच्छा भेट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवसेनेचे युवा नेते, उद्योजक श्री. प्रशांत मते यांनी दैनिक आरंभपर्व कार्यालयाला नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी दैनिकाच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सामाजिक, राजकीय तसेच विविध समकालीन विषयांवर मनमोकळी चर्चा झाली. दैनिक आरंभपर्वचे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांनी त्यांचे स्वागत केले. दैनिक आरंभपर्वला शुभेच्छा देताना प्रशांत मते यांनी आगामी काळात हे वर्तमानपत्र पुणेकर नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडत समाजहितासाठी प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी संपादिका सुरेखा मते, व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे, निवासी संपादक लक्ष्मण साबळे तसेच मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वडगाव बुद्रुक येथे अभिषेक व शिव-शंभू वंदना कार्यक्रम उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त समस्त ग्रामस्थ वडगाव बुद्रुक, केदारनाथ सार्वजनिक वाचनालय व सामाजिक संस्था तसेच धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज प्रतिष्ठान, वडगाव बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पंचामृत अभिषेक व शिव-शंभू वंदनेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास वडगाव बुद्रुक परिसरातील ग्रामस्थ व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी नगरसेवक हरिदास चरवड, संजय पवळे, चंदन कड, केदारनाना जाधव, युवराज जाधव, स्वप्निल वाघ, संदीप चरवड, संग्राम पवार, सिद्धार्थ पिसाळ, आकाश उभे, सुनिल चरवड , गणेश इंडे, पंकज फुले, मुगुट पासलकर, अनिल वाईगडे, अभिजित कवडे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, राष्ट्रनिष्ठा व हिंदवी स्वराज्यासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाचा गौरव करण्यात आला. तसेच उपस्थितांनी महाराजांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान "जय जिजाऊ, जय शिवराय, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला आणि वातावरण शिवमय झाले.



### कमान उभारणीसाठी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचे महापालिकेला निवेदन

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलवाडी येथील पारंपरिक कमान नव्याने विकसित करण्यासाठी माजी उपमहापौर तथा नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी पुणे महानगरपालिकेकडे निवेदन सादर केले आहे. प्रभाग क्रमांक २८ मधील विठ्ठलवाडी परिसर हा धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. येथील जुनी पारंपरिक कमान ही परिसराची ओळख असून, तिचे जतन व सुशोभीकरण करण्याची मागणी अनेक दिवसांपासून नागरिकांकडून होत होती. याची दखल घेत ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी महापालिका आयुक्तांकडे अधिकृत पत्राद्वारे कमान उभारणीस परवानगी देण्याची विनंती केली आहे. २०२६-२७ च्या बजेटमध्ये या कामासाठी तरतूद करण्यात आल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. सध्या कमानीचे काम बंद अवस्थेत असले तरी ही कमान विठ्ठलवाडीच्या ऐतिहासिक आणि पारंपरिक मंदिराशी संबंधित असल्याने ती नव्याने विकसित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कमान उभारताना कोणत्याही रस्त्याला अथवा शासकीय मालमत्तेला नुकसान होणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाईल, असेही ॲड. जगताप यांनी स्पष्ट केले आहे. या उपक्रमामुळे विठ्ठलवाडी परिसराच्या सौंदर्यात भर पडणार असून धार्मिक वारसा जपण्यास मदत होणार असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. परिसरातील भाविक आणि नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे. ॲड .प्रसन्नदादा जगताप यांनी केलेल्या मागणीवर लवकरच कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन यावेळी आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले.



### शिव-शंभू कॉरिडॉरला सार्वजनिक बांधकाम विभागाचा सकारात्मक प्रतिसाद

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी डॉ. अमोल कोल्हे यांनी मांडलेल्या ‘शिव-शंभू कॉरिडॉर’च्या मागणीला सार्वजनिक बांधकाम विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ला ते स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळ असलेल्या वढू बुद्रुक दरम्यान हा महत्त्वाकांक्षी कॉरिडॉर विकसित करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभागाने यासंदर्भातील सुमारे ३९० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करून तो अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मंडळ यांच्याकडे सादर केला आहे. त्यांच्या मान्यतेनंतर हा प्रस्ताव मुख्य अभियंत्यांमार्फत राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात अनेक ऐतिहासिक, धार्मिक आणि पर्यटनस्थळे असून ही सर्व ठिकाणे जोडणारा १० मीटर रुंदीचा सुमारे ६० किलोमीटर लांबीचा ‘शिव-शंभू कॉरिडॉर’ विकसित करण्यासाठी खासदार डॉ. कोल्हे गेल्या तीन ते चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत होते. या कॉरिडॉरमुळे शिवनेरी किल्ला परिसरातील पर्यटनस्थळे, ओझर व लेण्याद्री येथील अष्टविनायक गणपती मंदिरे, लेणी समूह, वाफगावचा ऐतिहासिक होळकरवाडा, पेशवेकालीन टाकसाळ, कनेरसरचे यमाई देवस्थान तसेच तुळापूर आणि वढू बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ अशी अनेक ऐतिहासिक स्थळे एकमेकांशी जोडली जाणार आहेत. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाममंत्री तसेच पुण्याचे पालकमंत्री यांच्याकडे सातत्याने पत्रव्यवहार आणि पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यानंतर पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

# शिवपुत्र संभाजी महाराजांच्या त्यागामुळेच स्वराज्याचा लढा जगभरात पोहोचला : आ. भीमराव तापकीर

**छत्रपती संभाजी महाराज जयंती व सरसेनापती वीर बाजी पासलकर यांचा पुण्यतिथीदिनी अभिवादन व वीर बाजी पासलकर स्मारकाचे लोकार्पण**



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या अतुलनीय त्यागातून स्वराज्य रक्षण केले. त्यांच्या याच त्यागामुळे भारतीय स्वराज्याचा लढा जगभरात पोहोचला. शिवपुत्र संभाजी महाराजांनी खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी राष्ट्राचे रक्षण केले,असे प्रतिपादन आमदार भीमराव तापकीर यांनी केले.

सिंहगड पायथ्याच्या निगडे मोसे (ता. राजगड) येथील ऐतिहासिक शिवशंभू शिल्प सृष्टीत छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती आणि स्वराज्याचे पहिले सरसेनापती वीर बाजी पासलकर यांच्या ३७७ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते सरसेनापती वीर बाजी पासलकर यांच्या स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार शंकरराव मांडेकर होते.

यावेळी बोलताना आमदार शंकरराव मांडेकर म्हणाले की, ही शिवरायांची कर्मभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत असून त्यांच्या सेवाव्रतामुळेच आम्हाला जनतेपर्यंत पोहोचता येते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हेच आमचे कर्तव्य आहे. मावळा जवान संघटनेच्या वतीने आयोजित या सोहळ्यात पारंपरिक रिवाजात दोन्ही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने शिवशंभू शिल्प सृष्टीत शिवकालीन शिक्के, नाणी, शस्त्रे, पत्रे आणि दस्तांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची विविध आज्ञापत्रे, आदेश तसेच सरसेनापती वीर बाजी पासलकर यांच्या घराण्यातील दुर्मिळ शिक्के आणि शिवकालीन शस्त्रास्त्रे पाहण्यासाठी शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. काळभैरवनाथ पतसंस्थेचे संस्थापक आर. जी. यादव यांना छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय सेवा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती अमोल नलावडे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हणुमंत धुमाळ, राजगड तालुका पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा राऊत, सरसेनापती वीर बाजी पासलकर यांचे वंशज बाळासाहेब पासलकर, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश पासलकर, डॉ. एन. बी. पासलकर, विष्णुपंत पासलकर, सरसेनापती वीर बाजी पासलकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाभाऊ पासलकर, द. स. पोळेकर, सुभाष जोरी, लक्ष्मण माताळे, किरण राऊत, मोसे खोरे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष लालूअण्णा पासलकर, बाजीराव पारगे, शंकरराव निवंगुणे, शशिकांत जाधव, सुयश दळवी, उमेश दारवटकर, शंकर दोन्हे, नाना धुमाळ, प्रमोद लोहकरे, नवनाथ पिलाने, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष ज्येष्ठ इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संयोजन तानाजी मरगळे, देविदास बेलुसे, लक्ष्मण दारवटकर, अमर रेणुसे, रोहित नलावडे यांनी केले होते.

## २५ वर्षांनंतर पुन्हा भरला वर्ग

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित महात्मा गांधी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बॅच २०००-२००१ च्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत पुन्हा एकदा शालेय जीवन अनुभवले.

रविंद्र कला मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहमेळाव्यास माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी नऊ वाजल्यापासून माजी विद्यार्थी एकत्र येऊ लागले. प्रत्येकाचे शाळेचा बॅच देऊन स्वागत करण्यात आले. अनेक वर्षांनी भेटलेल्या मित्र-मैत्रिणींनी गप्पांच्या माध्यमातून शाळेतील आठवणींना उजाळा दिला.



- **आठवणींच्या गप्पांत रमले महात्मा गांधी विद्यालयाचे माजी विद्यार्थी**

शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, क्रीडा स्पर्धांमधील उत्साह, शिक्षकांनी दिलेली शिक्षा तसेच स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आठवणींनी वातावरण भारावून गेले. काहींनी शाळेतील खोडकर प्रसंग सांगितले, तर काहींनी शिक्षकांच्या शिस्तीमुळे आयुष्याला योग्य दिशा मिळाल्याचे सांगितले.

## पुणे आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सव उत्साहात संपन्न

### ४२ देशांतील १५० कलाकारांच्या ३०० व्यंगचित्रांचा सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त युवा संवाद सामाजिक संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेला ‘पुणे आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सव’ उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. बालगंधर्व कलादालनात आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले होते.



उद्घाटन समारंभास आनंद दरबारचे अध्यक्ष बाळासाहेब धोका, पद्मा फाउंडेशनचे शशिकांत कांबळे, उद्योजक आकाश गायकवाड, ॲड. दिलीप जगताप, महोत्सवाचे आयोजक धनराज गरड, मुख्य समन्वयक किशोर शितोळे, कार्टुनिस्टस् कम्बाईनचे अध्यक्ष गौरव सर्जेराव, उपाध्यक्ष अमित पापळ आदी मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवाचे यंदाचे तिसरे वर्ष होते. यंदाच्या महोत्सवात देश-विदेशातील १५० कलाकारांच्या ३०० व्यंगचित्रांचा समावेश करण्यात आला होता. विविध सामाजिक, राजकीय आणि पर्यावरणीय विषयांवर आधारित व्यंगचित्रांची अनोखी मेजवानी पुणेकरांना अनुभवता आली.

प्रास्ताविकात धनराज गरड यांनी महोत्सवाची माहिती देताना जगभरातील व्यंगचित्रकारांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त केले.

उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले, “व्यंगचित्रकार व्यक्ती, सामाजिक परिस्थिती आणि ज्वलंत घटनांवर चपखल भाष्य करत रेषांच्या माध्यमातून प्रभावी संदेश देतात.


व्यंगचित्रकारांमध्ये समाजात क्रांती घडविण्याची आणि झोपलेली मने जागविण्याची ताकद आहे. त्यामुळे ही कला जिवंत ठेवणे आवश्यक आहे.”

या महोत्सवाला पुणेकर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, देश-विदेशातील व्यंगचित्रकारांच्या कलाकृतींनी प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

## सोसायटीचा स्तुत्य उपक्रम – नगरसेविका धनश्री कोल्हे

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नांदेड सिटी येथील भाग्यश्री सोसायटीमध्ये लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या मनोरंजनासाठी उभारण्यात आलेल्या “इंडोर गेम झोन” या उपक्रमाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपक्रमाचे उद्घाटन पुणे महापालिकेच्या नगरसेविका धनश्री दत्तात्रय कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी त्या म्हणाल्या की, आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात मुलांमध्ये मैदानी व बौद्धिक खेळांविषयीची आवड टिकून राहणे अत्यंत आवश्यक आहे, हीच बाब लक्षात घेऊन भाग्यश्री सोसायटीने मुलांसाठी इंडोर गेम झोनची संकल्पना प्रत्यक्षात आणत एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमामुळे मुलांना आनंददायी व सकारात्मक वातावरण मिळणार असून त्यांच्या मनोरंजनात तसेच बौद्धिक विकासात भर पडणार आहे, यावेळी नगरसेविका धनश्रीताई कोल्हे यांनी सोसायटीतील सर्व सदस्यांचे आभार मानत, “भविष्यातील पिढी घडवण्यासाठी आपण आज मोठा हातभार लावत आहात. लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे उपक्रम काळाची गरज आहेत. भविष्यातही असेच उपक्रम हाती घेऊन मुलांच्या आरोग्य, बौद्धिक विकास आणि संस्कारांबाबत विविध उपक्रम आपण सर्वांनी एकत्रितपणे राबवायला हवेत,” असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भाग्यश्री सोसायटीच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत सभासदांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे ओबीसी नेते प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, भाग्यश्री सोसायटीचे चेअरमन स्वप्निल कार्ले, कलाश्री सोसायटीचे चेअरमन हर्षद घुले, सेक्रेटरी सुरेश कदम, कमिटी सदस्य बापूराव गायकवाड, संदीप बावकर, मधुकर पाटील, श्यामसुंदर येमेवार, डॉ. टिकार, संदीप वाल्हेकर, दिनेश देडगे, सौ. जयश्री सरोदे, रेखा डोंगरवार, विठ्ठल ठाकर, वी. के. जोशी तसेच सोसायटीतील किलबिल परिवार व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गर्भलिंग निदान रॅकेटवर कारवाई; ‘पुणे कनेक्शन’ उघड

**श्रीरामपूर (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या पिंपरी निर्मळ येथील बेकायदा गर्भलिंग निदान प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी मोठी झेप घेतली. या रॅकेटला विनापरवाना सोनोग्राफी मशीन पुरविणाऱ्या ‘पुणे कनेक्शन’चा पोलिसांनी छडा लावला. पुण्याच्या दोन डॉक्टरांसह एका एजंटाला बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे गुन्ह्यातील अटक केलेल्या आरोपींची संख्या आता १६ झाली आहे. त्यात पाच डॉक्टरांचा समावेश असल्याने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नेवासे येथील डॉ. राहुल भणगे आणि एजंट प्रदीप ढगे यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेली सोनोग्राफी मशीन्स पुणे येथून खरेदी केल्याचे तपासात समोर आले. त्यानुसार जिल्हा पोलिस अधीक्षक एम. सुदर्शन व अपर अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी पुण्यात सापळा रचला. या मोहिमेत डॉ. आकाश सुभाष मलगुंडे (रा. शिरूर), डॉ. नीलकंठ अशोक जाधव (रा. लोहगाव) आणि नरेंद्र साहेबराव ठाकरे (रा. केसनांदगाव, हवेली) या तिघांना मध्यरात्री ताब्यात घेऊन लोणी येथे आणले व अटक केली. न्यायालयाने या तिघांनाही दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तपासात हस्तगत दोन्ही मशीन्स कुठेही अधिकृतपणे नोंदणीकृत नव्हती. आता, पुणे येथील या डॉक्टरांनी ही प्रतिबंधित मशीन्स नेमकी कोठून आणली, या साखळीत आणखी किती डॉक्टरांना अशी मशीन्स विकली गेली, याचा तपास पोलिस करत आहेत.

# अठरा वर्षांनी पुन्हा भरली शाळा; जुन्या आठवणींनी डोळे पाणावले

**शरद चंद्रजी पवार प्रशाला सारोळे २००६/२००७ बॅच गेट-टुगेदर कार्यक्रम**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ, शेळगाव संचलित शरदचंद्रजी पवार प्रशाला, सारोळे येथील इयत्ता दहावी 2006 -2007 बॅचचा गेट-टुगेदर कार्यक्रम अतिशय भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल अठरा वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी शाळेच्या आठवणींना उजाळा देत बालपण पुन्हा एकदा जगल्याचा अनुभव घेतला.

कधीकाळी एकत्र बसून शिक्षण घेतलेल्या वर्गमित्रांनी जेव्हा शाळेच्या प्रांगणात पुन्हा पाऊल ठेवले, तेव्हा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद तर डोळ्यांत जुन्या आठवणींचे अश्रू दिसत होते. अनेक जण आपल्या शिक्षकांना भेटताच भावुक झाले. विद्यार्थ्यांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात शिक्षकांचे स्वागत केले, त्या क्षणी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष बाबा गायकवाड अध्यक्षस्थानी होते. तसेच संस्थेचे संचालक तथा माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे, मुख्याध्यापक दीपक खंदारे यांच्यासह विश्वनाथ साबळे सर, सुनील खटाळ सर, प्रवीण गाढवे सर, तिकटे सर, अण्णासाहेब डोईफोडे सर, बळीराम गुरव सर, ब्रह्मदेव झेंडे सर, खोत सर,गोरे सर, दीपक गायकवाड सर, धनाजी शिंदे सर, प्रकाश भड सर, प्रकाश ठोकळ सर, श्रीमती गोडगे मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणी, मित्रांसोबत केलेली मस्ती, शिक्षकांचा मिळालेला आधार आणि जीवनातील संघर्ष याविषयी मनोगते व्यक्त केली. शाळेच्या भविष्यकाळाबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली.

अठरा वर्षांनंतर भेटलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी खो-खो खेळाचा आनंद घेत पुन्हा एकदा बालपण अनुभवले. खेळताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जुन्या दिवसांचे निरागस हास्य झळकत होते. “वेळ पुढे गेला, आयुष्य बदलले, पण शाळेच्या आठवणी आणि मैत्री आजही तितकीच जिवंत आहे,” अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर गाटे, प्रवीण गाटे, बाळासाहेब भाले, हिराकांत ढेकणे, अपेक्षा पाटील, प्रियंका गाटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरिता शिंदे व अपेक्षा पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंदाकिनी साबळे यांनी केले. अतिशय आनंदी, भावनिक आणि अविस्मरणीय वातावरणात हा स्नेहमेळावा संपन्न झाला.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी
## विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती**
**आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –**
**विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✔
- ग्रामपंचायत जाहिराती ✔
- निविदा / टेंडर नोटीस ✔
- जाहीर नोटीस ✔
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✔
- सहकारी संस्था जाहिराती ✔
- शैक्षणिक संस्था सूचना ✔
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✔
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✔
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✔

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




**आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यत पोहोचवण्यासाठी**
## आजच संपर्क साधा!

**संपर्क :**
प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

**दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"**